शालेय पोषण आहाराचे आता होणार ऑडिट

ऑडिटसाठी सनदी लेखापाल संस्थेची होणार नियुक्ती

महत्त्वाचे

ऊस रसाची पावडर बनवली

जालना : उसाचा रस हा आरोग्यासाठी गुणकारी असल्याने प्रत्येकजण याचा आस्वाद घेत असतात. मात्र, उसाचा रस फक्त गळीत हंगामाच्या काळात मिळत असतो. उसाचा रस १२ महिने मिळावा यासाठी हरियाणातील कर्नाल ऊस संशोधन केंद्राने एक संशोधन केले आहे.कर्नाल ऊस संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी उसाच्या रसाची पावडर तयार केली आहे. या पॅकिट बंद पावडरची वैधता उत्पादनाच्या तारखेपासून ६ महिने असणार आहे. ऊस संशोधन संस्थेच्या कर्नाल प्रादेशिक केंद्राचे अध्यक्ष डॉ. एम. एल. छाबरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्यूस पावडरच्या पॅकेटमध्ये २०० मिली पाणी मिसळून उसाचा ताजा रस तयार करता येतो. ऊस संशोधन संस्थेचे डॉ. के. हरी आणि इतर शास्त्रज्ञांनी एकत्रितपणे ही पावडर तयार केली आहे.

जि. प. शाळांमध्ये 'सीबीएसई पॅटर्न'

छत्रपती संभाजीनगर : सीबीएसई बोर्डाच्या शाळांकडे मुलांचा वाढता कल पाहता आता छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.ह्यासीबीएसईह्न पॅटर्नप्रमाणेच राज्य बोर्डाच्या शाळांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जूनऐवजी १ एप्रिलपासून करण्याचा प्रस्ताव सुकाणू समितीने शासनाला दिला. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून सीबीएसई पॅटर्न सुरू करण्यात येणार आहे. याची अंमलबजावणी २०२५-२६ पासून सुरू होणार आहे. त्यासाठी पवित्र पोर्टलनुसार नव्याने भरती करण्यात आलेल्या १२०० शिक्षकांना सीबीएसईप्रमाणे इंग्रजी व गणित विषयाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शस्त्र परवाने रद्दसाठी आंदोलन

बीड : जिल्ह्यात गुन्हेगारी वाढत आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाळूमाफिया, अपहरण, खून, खंडणी, मटका बुकर, गोळीबार या सारखे गंभीर गुन्ह्यांची शासन दरबारी नोंद असलेल्या शस्त्र परवाना धारकांचे परवाने रद्द करावेत, या मागणीसाठी सोमवारी दि. ३० डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्त्यांनी लहान मुलांच्या खेळणीतील पिस्तुलाने टिकल्या उडवत लक्षवेधी आंदोलन केले. जिल्ह्यात २०२३ च्या तुलनेत यावर्षी एक हजार ९८७ गुन्ह्यांची वाढ झाली आहे. आठवड्याला एक खून तर दोन दिवसाला खुनाचा प्रयत्न आणि अत्याचाराची घटना घडतेय. गेल्यावर्षी २०२३ मध्ये ११ महिन्यात ६२ खुन तर यावर्षी २०२४ मध्ये ४० खुनांची नोंद, २०२३ मध्ये १७८ खुनांचा प्रयत्न तर २०२४ मध्ये १७८ खुनाच्या प्रयत्नाच्या घटनांची नोंद झाली आहे.

पोलिसांनी कंबर कसली

छत्रपती संभाजीनगर : सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागतासाठी अवघे नागपूर शहर सज्ज झाले आहे. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडून नागरिकांच्या आनंदाला गालबोट लागू नये म्हणून पोलिसांनीही कंबर कसली आहे. अनेक तरुण-तरुणी उत्सवाच्या नावावर मद्यप्राशन करून रस्त्यावर गोंधळ घालतात. तर काही हुल्लडबाज भरधाव वाहन पळवून स्वतःसह दुसऱ्यांचा जीवही धोक्यात घालतात. त्यामुळे पोलिसांची मद्यपी व हुल्लडबाजांवर करडी नजर राहणार आहे. शहरात थर्टीफस्टला ठिकठिकाणी हॉटेल्स, क्लब, बिअर बार, ढाबे आणि फार्महाऊसमध्ये दारू पार्ट्यांचे आयोजन करण्यात येते.मद्यप्राशन करून तरुण-तरुणी नव्या वर्षाचे स्वागत करतात. त्यामुळे शहरात अपघात, भांडण, वाद, प्राणघातक हल्ले आणि अन्य गंभीर स्वरूपाच्या घटना घडतात. अशा घटनांवर आळा घालण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मस्साजोगमध्ये आज आंदोलन

बीड : जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली. २२ दिवसानंतर आज वर्षाच्या अखेरच्या दिवशी वाल्मिक कराड सीआयडी कार्यालयात शरण आला. या खून प्रकरणात आतापर्यंत पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी स्वतःच्या वाहनातून सीआयडी कार्यालयात पोहचला. पुण्यातील सीआयडी कार्यालयात कराड स्वतः हजर झाला. त्यामुळे या प्रकरणातील मोठी मागणी पूर्ण झाली. तरीही मस्साजोगचे सरपंच उद्या जलसमाधी आंदोलन करणार आहेत. नवीन वर्षाचे स्वागत ग्रामस्थ त्यांच्या आंदोलनाने करणार आहेत. १ जानेवारी २०२५ रोजी जलसमाधी आंदोलनाचा निर्णय मस्साजोग ग्रामस्थांनी घेतला आहे.. मस्साजोग ग्रामस्थांनी केज तहसीलदारांना या आंदोलनाविषयीचे निवेदन दिले आहे. मस्साजोग शिवारात ग्रामस्थ सामूहिक जल समाधी आंदोलन करणार आहेत.

हळदीचा बाजार टिकून

जालना : देशातील बाजारात हळदीचा बाजार मागील काही आठवड्यांपासून स्थिरावला आहे. हळदीचे भाव गेल्या वर्षभरातील उच्चांकी २० हजारांपासून १३ हजारांच्या दरम्यान आहेत. यंदा देशातील हळदीची लागवड वाढली. मात्र पिकाला पाऊस आणि बदलत्या वातावरणाचाही फटका बसत आहे. त्यामुळे हळद उत्पादनात मोठी वाढ होण्याची शक्यता कमीच आहे. आज देशातील बाजारात हळदीला १२ हजार ते १५ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला. नव्या मालाची आवक पुढील ३ आठवड्यांमध्ये सुरु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दरात काही आठवडे चढ उतार राहू शकतात, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

स्मारकाचे काम थांबवले

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजी नगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढ्यातील हुतात्मा झालेल्याच एक स्मारक विद्यापीठाच्या गेट समोर बांधण्यात येत आहे. दरम्यान, ज्या जागेवर हे स्मारक उभारले जात आहे, ती जागा वक्फ बोर्डाची असल्याचा दावा करण्यात आला असल्याने हे बांधकाम थांबवण्यात आले आहे. सईद जमीउद्दिन कादरी सईद सादिक अली यांनी ट्रिब्यूनल कोर्टात हा दावा दाखल केलाय.

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत जिल्हा परिषद व प्राथमिक शिक्षण संचालनालय स्तरावरून शाळांना शालेय पोषण आहारासाठी अनुदान दिले जाते. यान अनुदानाच्या माध्यमातून शाळांकडून विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. यामध्ये अनेकवेळा अनियमितता झाल्याच्या तक्रारी करण्यात येतात. परंतु, ही योजना योग्य पद्धतीने सुरू आहे का, याची पाहणी करण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने २०२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिलेल्या निर्देशानुसार, शहर, तालुका व जिल्हास्तरावर योजनेची अंमलबजावणी करताना २०२१ ते २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करण्यासाठी पुण्यातील शिर्दे, चव्हाण, गांधी अँड कंपनी या सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती केली आहे. या संस्थेमार्फत राज्यातील योजनेस पात्र सर्व शाळांचे लेखापरीक्षण करण्यात येणार असल्याने योजनेस पात्र शाळांना एका वेबफॉर्मद्वारे माहिती भरावी लागणार आहे.

शाळांनी माहिती देणे अनिवार्य

लेखापरीक्षणासाठी शाळांकडून कोणत्याही स्वरूपाची फी घेण्यात येणार नाही. लेखापरीक्षणासाठी सर्व शाळांनी माहिती देणे अनिवार्य आहे. लेखापरीक्षणास माहिती सादर न करणाऱ्या शाळाप्रमुखांकडून दंडात्मक तसेच प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांचे लेखापरीक्षण होण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांची राहील, असे देखील निर्देशांत स्पष्ट केले आहे.

कशाची होणार तपासणी?

तांदूळ खर्च विवरण नोंदवही, बँक पासबुक, कॅशबुकचा तपशील, तांदूळ साठा नोंदवही, इतर धान्य माल, शासन खाती भरणा केलेल्या रकमांच्या चलनांची प्रत यासोबतच सर्व प्रकारच्या खर्चाचे व्हाऊचर्स, उपयोगिता प्रमाणपत्रे आदींची तपासणी करण्यात येणार आहे.

दरम्यान, शाळांनी माहिती भरताना शाळेकडील उपलब्ध सर्व अभिलेखांचा आधार घेऊन योग्य, अचूक व वस्तुनिष्ठ माहिती भरावी. माहिती शाळांनी केवळ एकदाच भरायची आहे. त्यामुळे माहिती भरताना योग्य ती दक्षता शाळाप्रमुख, मुख्याध्यापक यांनी घेणे आवश्यक आहे. शाळांनी माहिती भरल्यानंतर संस्थेमार्फत टप्प्याटप्प्याने विविध जिल्ह्यांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. तालुकानिहाय लेखापरीक्षणाचा कार्यक्रम जिल्ह्यांना कळविण्यात येणार आहे.

घनसावंगीत बोरवेलमधून आले गरम पाणी

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

घनसावंगी : प्रतिनिधी

घनसावंगी : तालुक्यात दोन जणांच्या घराच्या बोरचे पाणी उपसा करताना गरम पाणी येत असल्याने नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे यामुळे ग्रामस्थ भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कंडारी परतुर ता. घनसावंगी येथील ऐन मध्य वस्तीत रहिवासी असलेले सिद्धेश्वर आसाराम काकडे व दत्ता गंगे यांच्या कडे गेल्या अनेक वर्षा पासून घरी बोर आहे. या बोर मधून सतत पाण्याचा उपसा सुरु आहे मात्र दोन दिवसापासून पाण्याचा उपसा सुरु केल्यास गरम पाणी येत आहे.

विशेष म्हणजे अंघोळ करण्याकरीता घेतलेल्या पाण्यामध्ये पाणी मिसळले असता अंगावर पाणी घेण्यासारखे पाणी राहिले नाही. सतत पाण्याचा बोरचा उपसा करण्यात येत असताना सुद्धा गरम पाणी कायम प्रमाणात येत आहे. अचानक झालेल्या बदलामुळे गावकऱ्यात भीतीचे वातावरण दरम्यान महसूल विभागाचे तलाठी आर. डी. कोनरवार यांनी भेट देऊन पाहणी केली संबंधित गरम पाण्यासंदर्भात तपासणी करून गावाला भीतीपासून दूर करावे अशी मागणी सरपंच व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंबंधी ग्रामस्थांनी भूजल सर्वेक्षण विभागाकडे दोन दिवसापूर्वी कळविण्यात आले मात्र त्यांनी याकडे कानाडोळा केला असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या आहे.

१५ मद्यधुंद चालकांवर केली कारवाई

३ दिवसांत २ लाख ८० हजारांचा दंड आकारला

जालना : प्रतिनिधी

शहरात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्यांवर १५ मद्यधुंद वाहनचालकांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. यामध्ये दोन लाख ८० हजारांचा दंड ठोठावला आहे. परिवहन आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार थर्टी फर्स्टनिमित्त ३० ते ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी दरम्यान उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून ड्रंक ॲण्ड ड्राइव्हची तपासणी मोहीम राबविण्यास सुरवात केली आहे.

उपप्रादेशिक परिवहन विभागाने मागील सहा महिन्यांत ५५ हजारांहून अधिक वाहनचालकांची तपासणी करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, मागील सहा महिन्यांत ४२ मध्ये वाहन चालकांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

दरम्यान, मागील तीन दिवसांत १५ मद्यधुंद चालकांवर दंडात्मक कार्य करण्यात आले आहे. ही मोहीम उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांच्या नेतृत्वाखाली मोटार वाहन निरीक्षक भीमराज नागरे, अनिल कदम, सहायक मोटार वाहन निरीक्षक दीपक जाधव, ओंकार कातोरे, अभिजित बावस्कर, संदीप लवस्कर यांनी केली.गळीत हंगामादरम्यान सुरक्षित ऊस वाहतुकीसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने विशेष उपाययोजना राबविल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८ वाहनांवर ४८ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वाहनांवर रिफ्लेक्टर पट्टया लावणे, वाहनांची उंची व लांबी मर्यादित ठेवणे यासह सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, काही वाहनांवर रिफ्लेक्टर नसल्याने ही कारवाई करण्यात आली.

ऊसतोड कामगारांना मिळणार शिक्षणाचे धडे

जालना :राज्यात साखर कारखान्यांचा यंदाचा गाळप हंगाम नोव्हेंबर पासून सुरू झाला आहे. यामुळे ऊसतोडणीसाठी स्थलांतरित झालेल्या कामगारांचे शिक्षण खंडीत होते. या कामगारांचे शिक्षण अखंडीत राहण्यासाठी साखर आयुक्त दीपक तावरे यांनी राज्यातील सर्व साखर कारखान्यांना एक आदेश काढला आहे. राज्यातील साखर कारखान्यांनी कारखाना परिसरात त्यांच्यासाठी अध्यापन- अभ्यास वर्ग सुरू करावेत, असा आदेश साखर आयुक्त तावरे यांनी दिला आहे. त्यामुळे राज्यातील ९६ सहकारी व ९३ खासगी, असा एकूण १८९ साखर कारखाना परिसरातील फडात ऊसतोडणी बरोबरच शिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत.केंद्र पुरस्कृत 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम' राज्यात सन २०२२ ते २०२७ या कालावधीत सुरू आहे. यामध्ये वयोगट १५ व त्यापुढील वयोगटातील असाक्षरांसाठी प्रौढ शिक्षण ऐवजी 'सर्वांसाठी शिक्षण' या नावाने हा कार्यक्रम सुरू आहे.

कापसाला समाधानकारक दर मिळेना

उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका

वाळूज : प्रतिनिधी

यंदा कापसाचे उत्पादन समाधानकारक झाले असले तरी कापसाला किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे.दरम्यान, योग्य भाव मिळत नसल्यामुळे काही शेतकऱ्यांनी कापूस साठवून ठेवला आहे.मात्र काही अल्पभूधारक शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्याने कापूस विकावा लागत आहे. यामुळे उत्पादक शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे.

दरम्यान, नैसर्गिक आपत्तीनंतर शिल्लक राहिलेल्या कापसाला चांगला भाव मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. यावर्षी कापूस दसऱ्यापासून बाजारात येण्यास सुरुवात झाली. मात्र परतीच्या मान्सूनच्या पावसाचा फटका कपाशीला बसला आहे आणि नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी शेतातून कापूस साठवून ठेवण्याऐवजी थेट बाजारात विक्रीसाठी आणत आहेत.

याचा फायदा घेत अनेक ठिकाणचे व्यापारी कमी भावाने कापूस खरेदी करत आहेत. केंद्र सरकारने २०२४-२५ साठी कापसासाठी हमीभाव जाहीर केला आहे. किमान आधारभूत किमतीत ५०१ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या सत्रात मध्यम फायबर कापसासाठी ७१२१ रुपये आणि लांब फायबर कापसासाठी ७५२१ रुपये हमीभाव घोषित करण्यात आला आहे.मात्र खासगी व्यापारी यापेक्षा कमी भाव देत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

अल्प भूधारक शेतकरी अडचणीत

कापसाला भाव अद्यापही समाधानकारक नाही. यासाठी शेतकऱ्यांनी कापूस साठवून ठेवला आहे. मात्र काही अल्पभूधारक शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्याने कापूस विकावा लागत आहे. याचा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसत आहे. केंद्र सरकारने निर्धारित केलेली किमान आधारभुत किंमत ७५०० रुपये आहे. मात्र खासगी बाजारात कापसाचे भाव गडगडले आहेत. खासगी व्यापारी कापसाला ६८०० ते ७००० रुपये भाव देत असल्याने शेतकऱ्यांना एमएसपीपेक्षा कमी दराने कापूस विकावा लागत आहे. आंतरराष्ट्रीय वायदे बाजारात कापसाचे भाव वाढले आहेत.

वर्षभरात बिबट्याने घेतला १३४ पशुधनांचा बळी

शेतकरी, नागरिकांत भीतीचे वातावरण

कन्नड : प्रतिनिधी



सरत्या वर्षभरात तालुक्यामध्ये बिबट्याने तब्बल १३४ पशुधनासह एका १४ वर्षीय बालकाचा बळी घेतलेला आहे. दरम्यान, रात्रीच्या वेळी दिसणारे बिबटे आता भरदिवसादेखील दिसत असल्याने शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

मागील पाच वर्षांत उसाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने बिबट्यांची संख्या देखील चांगलीच वाढल्याने ग्रामीण भागात त्यांचा संचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गौताळा अभयारण्यात बिबट्यांचा अधिवास असून, पट्टेदार वाघ अभयारण्यात आला असावा म्हणून बिबट्यांचा संचार हा ग्रामीण भागात वाढला आहे.तालुक्यात ऊस व मका पिकाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्याने बिबट्याला आश्रय मिळत आहे. त्यामुळे ऊसतोड कामगार, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शेतातील गोठ्यात, पत्राच्या शेडमध्ये बांधलेल्या पशुधनांचा बिबटे दिवसाआड फडशा पाडत आहेत. शिवाय रस्त्याने दुचाकीवरून जाणाऱ्या शेतकऱ्यांवर हल्ला करण्याचा प्रयत्नही बिबट्यांनी केल्याने रात्री अपरात्री शेतात जाण्यास शेतकरी धजावत नाहीत.

सध्या ऊसतोडणी सुरू असल्याने बिबटे उसातून बाहेर पडून मानवी वस्तीकडे आता आश्रय शोधत आहेत. रात्रीच्या वेळी बिबटे शिकारीच्या शोधात संचार करित असून पाळीव प्राण्यांना लक्ष बनवित आहेत. शेतात बिबटे आढळून येत असल्याने शेतमजूरही शेती कामासाठी येण्यास धजावत नाहीत. वन विभागाने यावर उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

प्रतिनिधी : खुलताबाद

तालुक्यातील एका तरुणाने बाजार सावंगी येथील एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. रोहित शेषराव फटाकडे (वय २५) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. आत्महत्या करण्यापूर्वी रोहितने त्याचा मित्र मनोज जाधव यास रविवारी रात्री साडेअकराच्या सुमारास फोन करून आत्महत्या करीत असल्याचे सांगितले होते. तेव्हढ्यात रात्री त्याचा शोध घेत त्याला भेटून सल्ला देत आज आपण कुठेतरी कोणत्यातरी हॉटेलमध्ये राहू, असे सांगून दोघेही अखेर त्या हॉटेलला थांबले व दोघेही हॉटेलच्या वेगवेगळ्या खोल्यांमध्ये झोपी गेले होते. सकाळी सातला मनोज जाधव झोपेतून उठून त्याच्या खोलीत भेटण्यासाठी गेला असता त्याला रोहित गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. या घटनेमुळे घाबरलेल्या मनोजने रोहितचे नातेवाईक बाळू पांडुरंग बनसोड यांना कळविले असता, त्यांनी बाजारसावंगी पोलिस चौकीत कळविले. त्यावरून मुख्य जमादार नवनाथ कोल्हे, जमादार विनोद बनसोड, प्रकाश ठोकर, संजय पुंड हे घटनास्थळी दाखल झाले.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग,
प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, [illegible]
सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

[illegible] 2002 [54 ऑफ 2002] [illegible] "जसे आहे जिथे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी" [illegible] "सार्वजनिकलिलाव" [illegible]

कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	मागणी सूचना दिनांक	बयाणा रक्कम राखीव किमतीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण थकबाकी 28.12.2024 पर्यंत	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	[illegible] तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. [illegible] 2. [illegible]	[illegible] 4.04 [illegible] 4.890% [illegible] 12/[illegible] आणि 13/[illegible] औरंगाबाद [illegible] पूर्व: [illegible] 25 फूट [illegible] पश्चिम: [illegible] 03, उत्तर: [illegible] 04, दक्षिण: [illegible] 25 फूट [illegible]	H01553190 821035946 / H01553190 821035946 L	2 डिसेंबर 2024	रु. 2,23,368/-	रु. 37,27,489.87	रु. 22,33,680	[illegible] 10.00 ते [illegible] 5.30 [illegible]	21/02/2025 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. [illegible]
2. [illegible] "जसे आहे जिथे आहे तत्त्वावर" आणि "जशी आहे त्या स्थितीत आहे" [illegible]
3. [illegible] 20/02/2025 [illegible] 10% [illegible]
4. [illegible] 7 [illegible]
5. [illegible] 25% [illegible] 21/02/2024 [illegible] 22/02/2024 [illegible] 75% [illegible]
6. [illegible] 9823271111, [illegible] 301, [illegible] पुणे - 411005 [illegible] 177, [illegible] मुंबई - 400. [illegible]
7. [illegible]
8. [illegible] 8 (6) [illegible]
9. [illegible] 2002 [illegible]
10. [illegible]

दिनांक: 01.01.2025
ठिकाण: औरंगाबाद

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड